


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १५७। किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार ३०/०६/२०२६ । पाने - ६





# नराधम भीमराव कांबळेला फाशी

## ६० दिवसांत फास्ट ट्रॅक कोर्टाचा निकाल

पुणे (वृत्तसंस्था)

पुण्यातील भोर तालुक्यामधील नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अत्याचार प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली होती. आरोपी भीमराव कांबळे याने चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केली. पुणे विशेष न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला दोषी ठरवले आहे. १ मे २०२६ रोजी आरोपीने हा क्रूर गुन्हा केला होता. याचे सीसीटीव्ही फुटेज देखील पुढे आले. ज्यात आरोपी भीमराव कांबळे हा चिमुकलीला हाताल धरून घेऊन जाताना स्पष्ट दिसले. आरोपीने आपला गुन्हा देखील मान्य केला.




त्याच्या कुटुंबियांनी देखील त्याला कडक शासन व्हावे, अशी मागणी केली. आरोपीने खाऊ देण्याच्या बहाण्याने तिच्यावर अत्याचार केला होता. चिमुकलीचा शेणाच्या ढिगाऱ्यात मृतदेह लपवला होता. सीसीटीव्ही आधारे आरोपी भीमराव कांबळे याला पकडण्यात आले होते. कोर्टाने मागच्या सुनावणीत भीमराव कांबळे याला दोषी ठरवले. मात्र, त्याचा निकाल २९ जून रोजी राखीव ठेवला. अखेर या प्रकरणातील निकाल पुढे आला. कोर्टाने आरोपी भीमराव कांबळे याला कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. दोन्ही बाजूचा निकाल कोर्टाने ऐकून घेतला, असल्याचे न्यायालयाने म्हटले. यादरम्यान न्यायाधीशांनी घटनांचा दाखला दिला. घटना किती जास्त क्रूर आहे, हे समजून घ्यावे, लागेल असे न्यायाधिशांनी सुनावणीदरम्यान म्हटले. यादरम्यान कोर्टाबाहेर मोठा पोलिस बंदोबस्त बघायला मिळत आहे. आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी चिमुकलीच्या कुटुंबियांनी केली होती. कोर्टात चिमुकलीचे आई वडील उपस्थित होते. आरोपी भीमराव कांबळे याला मृत्यूदंड की, जन्मठेप सुनावणार यावरून गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होती, अखेर कोर्टाने नुकताच याबाबत निकाल दिला आहे. आरोपीने आपला गुन्हा देखील मान्य केला.दोन्ही बाजूंचे निकाल ऐकून घेतल्यानंतर कोर्ट शिक्षेपर्यंत पोहोचत असल्याचे न्यायाधिशांनी म्हटले. या प्रकरणानंतर राज्यभरात मोर्चे निघाले, आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी केली जात होती. कुटुंबियांनीही आक्रमक भूमिका घेतली होती. राज्यातील अनेक बडे नेते चिमुकलीच्या कुटुंबियांच्या भेटीला पोहोचले होते. केसच्या सुनावणीदरम्यान कोर्टाकडून अनेक केसचे दाखले देण्यात आली. अनेक प्रकरणांमध्ये आरोपींना फाशीचा शिक्षा झाल्याचे कोर्टाने नमूद केले. आरोपी विरोधात सबळ पुरावे असल्याचे कोर्टाने नमूद केले. शेवटी भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा कोर्टाने सुनावली.

# काहींच्या रक्तात आणि नसानसात गद्दारी - ठाकरे

## खा. भाऊसाहेब वाकचौरेंवर घणाघात



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिर्डी येथे आयोजित जाहीर सभेत शिंदे गटात प्रवेश केलेले शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर अत्यंत प्रखर आणि जहाल शब्दांत टीका करत त्यांच्यावर हल्लाबोल चढवला. काहींच्या रक्तात आणि नसानसात गद्दारी भरलेली असते. त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे खाऊसाहेब वाकचौरे, अशा शब्दांत त्यांनी वाकचौरेंचा उल्लेख करत उपस्थित शिवसैनिकांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला.

शिवसेनेतील सहा खासदारांनी अलीकडेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील (पान ६ वर)

### रावसाहेब खेवरे 'शिंदे' वासी

**रावसाहेब खेवरे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उत्तर जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिर्डी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे ठाकरे गटाला मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. यापूर्वी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह ठाकरे गटातील सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर आता खेवरे यांनीही पक्षाची साथ सोडल्याने जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विशेष म्हणजे, शिवसेनेत फूट पडल्यानंतर रावसाहेब खेवरे हे ठाकरे गटाचे उत्तर जिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत होते आणि त्यांनी शिंदे गटाचे खासदार सदाशिव लोखंडे यांच्यावर अनेकदा आक्रमक टीका केली होती. मात्र, आता त्यांनीच शिंदे गटात प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.**

# पेपरफुटी, किडनी विक्री आणि पत्रकारांना धमक्या

## पावसाळी अधिवेशनात महायुती सरकारविरोधात विरोधकांचा एल्गार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी टीईटी पेपरफुटी प्रकरण, सावकारी कर्जामुळे किडनी विक्री प्रकरण आणि पत्रकारांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरून महाविकास आघाडीच्या आमदारांनी महायुती सरकारला चांगलेच धारेवर धरले. विधान भवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी करत विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली.

टीईटी पेपरफुटी प्रकरणावरून महाविकास आघाडीचे आमदार संतप्त झाले. राज्यातील लाखो उमेदवारांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या गंभीर घोटाळ्याला थेट महायुती सरकार जबाबदार असल्याचा आरोप करत विरोधी आमदारांनी विधान भवन परिसरात जोरदार आंदोलन केले. पेपर फुटले भिवंडीला, पैसे गेले मालेगावला... तसेच शिक्षकांचे नुकसान करणाऱ्या सरकारचा निषेध असो अशा घोषणांनी विधान भवन परिसर दणाणून गेला. या पेपरफुटीमुळे लाखो तरुणांचे भविष्य अंधारात गेले असून, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी विरोधकांनी केली.

दरम्यान, सावकारी कर्जामुळे किडनी विक्रीस भाग पाडल्याच्या गाजत असलेल्या रोशन कुळे प्रकरणावरून काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला लक्ष्य केले. प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभेत बोलताना वडेट्टीवार यांनी मुख्य सूत्रधार म्हणून नाव समोर आलेल्या दिवाकर निकुरे याला अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. दिवाकर निकुरे या सावकाराने शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावत सुमारे १३० धनादेश दिले. मात्र, हे सर्व धनादेश बाऊन्स झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणात फसवणूक करूनही संबंधित आरोपी अद्याप फरार आहे. त्याच्यावर कारवाई का होत नाही? सरकार त्याला पाठीशी घालत आहे का? असा थेट सवाल वडेट्टीवार यांनी सभागृहात उपस्थित केला. याशिवाय अधिवेशनादरम्यान पत्रकारांना कथित धमक्या देण्यात आल्याच्या आणि अपशब्द वापरण्यात आल्याच्या मुद्द्यावरूनही विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल केला.















# राजाभाऊ वाजेंचा सत्कार म्हणजे लोकशाहीचा सन्मान - माजी मंत्री थोरात



आज अनेक आमिषे, दबाव आणि सत्तेची प्रलोभने निर्माण होत असताना शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी आपल्या विचारांशी, भूमिकेशी आणि नेतृत्वाशी कोणतीही तडजोड केली नाही. कोट्यवधी रुपयांच्या आमिषालाही न जुमानता त्यांनी निष्ठा, प्रामाणिकपणा आणि संविधाननिष्ठेचा आदर्श घालून दिला आहे. त्यामुळे हा केवळ एका खासदाराचा सत्कार नसून लोकशाही, भारतीय राज्यघटना आणि मूल्याधिष्ठित राजकारणाचा सन्मान आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सिन्नर येथे खासदार राजाभाऊ वाजे व त्यांचे वडील ज्येष्ठ नेते प्रकाशभाऊ वाजे यांच्या भव्य नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. या प्रेरणादायी सोहळ्यास माजी आमदार विलासभाऊ लोणारी, नितीन चंदनशिवे, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बाळासाहेब थोरात म्हणाले की, सध्या राज्यात आणि देशात मोठ्या प्रमाणावर राजकीय फोडाफोडीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकांना सत्तेची प्रलोभने दाखविली जात आहेत. अनेक नेते आणि लोकप्रतिनिधींनी सत्तेच्या मोहापायी आपली भूमिका बदलली. सहा खासदारांनी पक्षाची साथ सोडली, मात्र राजाभाऊ वाजे यांनी कोणत्याही दबावाला किंवा आमिषाला बळी न पडता आपल्या विचारांशी प्रामाणिक राहण्याचा निर्णय घेतला. त्यांनी 'ऑपरेशन टायगर'सारख्या राजकीय घडामोडींनाही ठामपणे तोंड देत आपली भूमिका कायम ठेवली.

आज महाराष्ट्रात आणि देशात विचारांशी तडजोड न करणारी माणसे अजूनही आहेत, हे राजाभाऊ वाजे यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखविले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे केवळ कार्यकर्त्यांनाच नव्हे, तर नव्या पिढीलाही मोठी प्रेरणा मिळणार आहे, असेही थोरात यांनी सांगितले.

देशातील लोकशाही संस्था आणि भारतीय राज्यघटनेवरील विश्वास कायम राखणे ही काळाची गरज असल्याचे सांगताना थोरात म्हणाले की, आज देश कोणत्या दिशेने चालला आहे, याचा प्रत्येक नागरिकाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. घटनात्मक संस्थांबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होत असतील, तर त्यावर संवेदनशीलतेने विचार होणे आवश्यक आहे. लोकशाही मजबूत राहण्यासाठी संविधानिक मूल्यांचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली भारतीय राज्यघटना ही देशाची सर्वात मोठी ताकद असल्याचे सांगत त्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले. संविधानाचे रक्षण करणे ही प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. जाती-धर्माच्या नावावर समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न ओळखा आणि त्यापासून सावध राहा. भारताची एकता, लोकशाही आणि संविधान टिकवायचे असेल, तर संविधानिक मूल्यांच्या संरक्षणासाठी एकत्र येण्याची हीच योग्य वेळ आहे, असेही ते म्हणाले.

खासदार राजाभाऊ वाजे यांनी घेतलेली भूमिका ही केवळ राजकीय भूमिका नसून लोकशाही अधिक बळकट करणारी भूमिका असल्याचे नमूद करत, अशा मूल्यनिष्ठ नेतृत्वाच्या पाठीशी कार्यकर्ते आणि जनतेने खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

# सरसकट कर्जमाफीसाठी रोहित पवारांचा एल्गार
## सरकारला 'जेलभरो' आंदोलनाचा इशारा



मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार छत्रपती संभाजीनगरात मोठे आंदोलन करणार असून, आंदोलनापूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. पंढरपूर आंदोलनावेळी सरकारने दिलेले आश्वासन पाळले नसल्याचा आरोप करत, सरकारने हा संघर्ष दडपण्याचा प्रयत्न केला तर जेलभरो आंदोलन करू. गरज पडल्यास विदर्भात यापेक्षाही मोठे आंदोलन उभारू, असा इशारा त्यांनी दिला.

आज केंब्रिज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून, त्यानंतर पुढील भूमिका शेतकऱ्यांशी चर्चा करून ठरवली जाणार आहे. या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार शशिकांत शिंदे यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते सहभागी होणार आहेत. रोहित पवार यांनी राज्य सरकारच्या कर्जमाफीच्या जीआरवर पुन्हा एकदा आक्षेप घेतला. कर्जमाफीतील अटी आणि त्रुटींमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहणार असल्याचा आरोप त्यांनी केला. यासोबतच पीकविमा योजनेतील बदलांवरही त्यांनी सरकारला धारेवर धरले. त्यांच्या म्हणण्यानुसार, राज्यातील शेतकऱ्यांचे सुमारे १७ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले, मात्र पीकविमा योजनेतील 'ट्रिगर' काढून टाकल्यामुळे शेतकऱ्यांना केवळ सुमारे १,२०० कोटी रुपयांची भरपाई मिळाली. त्यामुळे जवळपास १६ हजार कोटी रुपयांच्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांना मिळाली नाही. त्यामुळे पीकविमा योजनेतील हटवलेले चारही ट्रिगर पुन्हा लागू करावेत, अशीही त्यांनी मागणी केली.

रोहित पवार म्हणाले की, पंढरपूरमध्ये झालेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी मंत्री गिरीश महाजन आले होते. त्यांनी मुख्यमंत्र्यांशी फोनवर चर्चा करून अधिवेशन सुरू होण्यापूर्वी शेतकरी नेत्यांसोबत बैठक घेण्याचे आणि मागण्यांवर चर्चा करण्याचे आश्वासन दिले होते.

# संगमनेर–पुणे मार्गावर शिवस्मृती टूर्सची प्रीमियम प्रवासी सेवा सुरू




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर ते पुणे आणि पुणे ते संगमनेर प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आता अधिक सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर प्रवासाचा पर्याय उपलब्ध झाला आहे. शिवस्मृती टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या वतीने संगमनेर-पुणे-संगमनेर या मार्गावर प्रीमियम प्रवासी सेवा सुरू करण्यात आली असून, या सेवेला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या सेवेसाठी वातानुकूलित फोर्स अर्बानिया (१७+१ आसनी) तसेच इनोव्हा क्रिस्टा (७+१ आसनी) वाहनांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आरामदायी लक्झरी आसने, पूर्ण एसी सुविधा, मोबाईल चार्जिंगसाठी यूएसबी पॉइंट, प्रशस्त लगेज स्पेस आणि प्रशिक्षित चालक यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर व सुरक्षित होत आहे. याशिवाय पार्सल पोहोच करणे किंवा आणण्याची सोय सुध्दा करण्यात आली आहे.

संगमनेरहून पुण्याकडे जाणारी सेवा दररोज सकाळी ६ वाजता, तर पुण्याहून संगमनेरकडे परतीची सेवा दररोज सायंकाळी ६ वाजता सुरू होते. वेळेचे काटेकोर नियोजन आणि दर्जेदार सेवा हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य असल्याचे संचालकांनी सांगितले. प्रवासादरम्यान प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, वाहनांची नियमित देखभाल, स्वच्छता आणि प्रवाशांच्या सोयी-सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक तसेच कौटुंबिक प्रवाशांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

संगमनेरमधील जानता राजा मार्ग येथे शिवस्मृती टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे कार्यालय असून, प्रवाशांसाठी आगाऊ बुकिंगची सुविधाही उपलब्ध आहे. बुकिंगसाठी ७७४४९९२४११ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आपला प्रवास, आमची जबाबदारी हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू करण्यात आलेली ही सेवा संगमनेर-पुणे मार्गावरील प्रवाशांसाठी विश्वासार्ह, सुरक्षित आणि प्रीमियम प्रवासाचा नवा पर्याय ठरत आहे.

# राज्यात मुसळधार पावसाची हजेरी; हवामान विभागाचा इशारा



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात पावसाचा जोर दि. २९ जूनपासून वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. मुंबईसह कोकणपट्टीत आणि घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम किनारपट्टी, संपूर्ण कोकण आणि सह्याद्रीच्या घाटभागात दि. २९ जून ते दि. २ जुलै या काळात पावसाचा जोर वाढेल.बंगालच्या उपसागरात तयार होणाऱ्या हवामान प्रणालीमुळे दि. १ आणि दि. २ जुलै या कालावधीत तळकोकण, गोवा तसेच मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाचा जोर लक्षणीय असेल. हवामान अभ्यासकांच्या मते, २ ते ९ जुलै या काळात कोकण (मुंबई आणि एमएमआर परिसरासह), उत्तर महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. केवळ ३ ते ६ दिवसांच्या कालावधीत काही भागांत ५०० मिलीमीटर इतका पाऊस होईल. हा पाऊस मुंबईकरांना गेल्यावर्षीच्या दि. १६ ते दि. २० ऑगस्टच्या पावसाची आठवण करून देणारा ठरू शकतो.दरम्यान, जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर जास्त राहणार असल्याने विशेषतः मुंबई, कोकण आणि घाटभागातून प्रवास करताना हवामानाचा अंदाज घेऊनच बाहेर पडावे.अतिमुसळधार पावसाचे कारण : मध्य प्रदेशवर दि. २ जुलैच्या सुमारास मान्सूनचा पहिला तीव्र कमी दाबाचा पट्टा तयार होऊन तो नैऋत्येकडे सरकण्याची शक्यता आहे. तसेच दि. ४ जुलैच्या सुमारास बंगालच्या उपसागरात आणखी एक कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊ शकते. या दोन्ही प्रणाली मान्सूनच्या ट्रफमुळे एकमेकांशी जोडल्या जातील आणि पाऊस सक्रिय होईल.मुंबई व आसपासच्या भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात या काळात चांगला पाऊस होईल. यामुळे धरणांमधील पाणी पातळीत २५ ते ४० टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. जुलै महिन्याचे पहिले दोन आठवडे देशभरात पावसाच्या दृष्टीने उत्तम राहतील. या काळात मान्सूनचा हा नवीन प्रवाह संपूर्ण भारताला व्यापण्याची शक्यता आहे. सध्या गोव्यापासून केरळपर्यंत समुद्रात ढगांची दाट गर्दी पाहायला मिळत असून, मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी ही अनुकूल स्थिती आहे.

# पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सकाळचे उमेश शेळके



पुणे (प्रतिनिधी)

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या २०२६-२७ या वर्षासाठी झालेल्या वार्षिक निवडणुकीत दैनिक सकाळचे वरिष्ठ पत्रकार उमेश शेळके अध्यक्षपदी विजयी झाले. तर दैनिक लोकमतचे हिरा सरवदे यांची सरचिटणीसपदी बिनविरोध निवड झाली. खजिनदारपदी महाराष्ट्र टाइम्सचे प्रसाद पानसे यांनी विजय मिळविला.

निवडणुकीनंतर नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. उपाध्यक्षपदी पुढारीचे किशोर बरकाले आणि टीव्ही ९चे योगेश बोरसे यांची निवड झाली. चिटणीसपदी दैनिक भास्करचे राहुल देशमुख आणि लोकसत्ताचे संजय सपकाळे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून टीव्ही ९चे सुशांत राऊत, प्रभातचे ज्ञानेश्वर फड, लोकमतचे उद्धव धुमाळे, नवभारत/नवराष्ट्रचे अक्षयकुमार फाटक, पुढारी न्यूजचे तुषार झरेकर, महाराष्ट्र टाइम्सचे गोपाळ गुरव, तरुण भारतचे दीपक होमकर, प्रभातचे मिलिंद शुक्ल, लोकसत्ताचे मनोजकुमार मोरे आणि सकाळचे सचिन वाघमारे यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड झाली.

या निवडणुकीची प्रक्रिया मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. प्रताप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. त्यांना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. स्वप्नील जोशी यांनी सहकार्य केले.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याची तसेच संघटनेला अधिक बळकट करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल पत्रकार संघटनांसह विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आंतरराष्ट्रीय कराराद्वारे एसएमबीटीत वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी अनोखा उपक्रम




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - 'सर्वे सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः' अर्थात सर्वजण सुखी होवोत आणि सर्वजण रोगमुक्त राहोत, या भारतीय तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेत, एसएमबीटी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर येथे एक आठवड्याचा विशेष शैक्षणिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी बार्सिलोना, स्पेन येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ आणि मानवतावादी प्राध्यापक प्रा. जोनाथन मॅकफर्लंड उपस्थित होते. त्यांच्या भेटीमुळे एसएमबीटी आणि जागतिक संस्थांमधील आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होण्याच्या घटना घडताना दिसतात. या पार्श्वभूमीवर वैद्यकीय शिक्षणाच्या माध्यमातून हे नाते अधिक संवेदनशील, सुदृढ आणि विश्वासार्ह करण्यासाठी एसएमबीटीत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हा शैक्षणिक करार एसएमबीटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, युनिव्हर्सिटी पॉम्पेऊ फॅब्रा, बार्सिलोना आणि 'ढहश उेर्ळींी री र र्कीरपळींी' या संस्थांमध्ये करण्यात आला. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित वैद्यकीय क्षेत्रात रुग्णांप्रती दया, सहानुभूती आणि सेवाभाव टिकवून ठेवण्यासाठी ही जागतिक चळवळ कार्यरत आहे. प्रा. मॅकफर्लंड हे युनिव्हर्सिटी पॉम्पेऊ फॅब्रा येथे असोसिएट प्रोफेसर असून या जागतिक चळवळीचे संस्थापक-अध्यक्ष आहेत. त्यांच्या या भेटीमुळे दीर्घकालीन शैक्षणिक सहकार्याची भक्कम पायाभरणी झाली आहे.

या धोरणात्मक चर्चेचा एक महत्त्वाचा भाग म्हणून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'र्कीरपळीा ळप चशवळलळपश' या विषयावर विशेष अभ्यासक्रम तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम भारताच्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या नियमावली आणि गरजांनुसार तयार केला जाणार आहे. याशिवाय, दोन्ही संस्थांमध्ये संयुक्त संशोधन, शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थी आणि शिक्षकांची देवाणघेवाण तसेच विशेष प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यावरही शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश म्हणजे वैज्ञानिक अचूकता आणि नैतिक जबाबदारीची जाणीव असणारे डॉक्टर घडविणे हा आहे.

आपल्या दौऱ्यात प्रा. मॅकफर्लंड यांनी एसएमबीटीमधील डॉक्टर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष मास्टरक्लास घेतला. या सत्रात त्यांनी डिजिटल युगातही रुग्णांशी जिव्हाळ्याचे, आपुलकीचे आणि विश्वासार्ह संबंध कसे टिकवून ठेवावेत, याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी एसएमबीटीच्या नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी कॅम्पसला भेट देऊन मेडिकल, डेंटल, आयुर्वेद, नर्सिंग, फिजिओथेरपी आणि फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधला. तसेच, या सर्व संस्थांमध्ये सुरू असलेल्या शैक्षणिक आणि वैद्यकीय कार्याची सविस्तर माहिती घेतली. विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या जागतिक दर्जाच्या सुविधा आणि मानवी मूल्यांवर आधारित शिक्षणपद्धती पाहून त्यांनी विशेष आनंद व्यक्त केला.

स्थानिक पातळीवर दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवा समजून घेण्यासाठी प्रा. मॅकफर्लंड यांनी एसएमबीटीच्या एकदरे येथील ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्राला तसेच कोळवाडे येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेला भेट दिली. एसएमबीटीच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, भारतातील मजबूत सामाजिक बंध आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा वैद्यकीय क्षेत्रात मानवतावादी दृष्टिकोन रुजविण्यासाठी जगभरासाठी एक आदर्श उदाहरण ठरू शकतो.

विविध विभागांतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधताना प्रा. मॅकफर्लंड यांनी वैद्यकीय क्षेत्रातील वेगवेगळ्या शाखांमध्ये काम करताना रुग्णांशी भावनिक नाते कसे जोडावे, तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी स्पर्श कसा जपावा आणि आरोग्यसेवेतील विविध क्षेत्रांनी एकत्र येऊन रुग्णांची सर्वांगीण काळजी कशी घ्यावी, यावर मार्गदर्शन केले.

## ग्रामीण भागात एसएमबीटीचे कार्य अतुलनीय

**एसएमबीटी संस्थेने ग्रामीण आणि आदिवासी भागात ज्या पद्धतीने आरोग्यसेवांचे जाळे निर्माण केले आहे, ते खरोखरच कौतुकास्पद आहे.भारतातील लोकांमध्ये असलेले कौटुंबिक आणि सामाजिक बंध अत्यंत घट्ट आहेत. हाच समृद्ध सांस्कृतिक वारसा वैद्यकीय क्षेत्रात मानवतावादी दृष्टिकोन रुजविण्यासाठी जगभरासाठी एक आदर्श उदाहरण ठरू शकतो. आयुर्वेद हॉस्पिटल भेटीत मी स्वत: भारतीय आयुर्वेद उपचारांचा अनुभव घेतला. शिरोधारा करून घेत आयुर्वेदाचे महत्व जाणून घेतले. येणाऱ्या काळात आयुर्वेदाला आणखी चांगले दिवस येतील यात शंका नाही. एसएमबीटीसोबत शैक्षणिक करार करून भारतातील या संस्कृतीच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणाला नवी दिशा देण्याचा माझा प्रयत्न असेल.**

**प्रा. जोनाथन मॅकफर्लंड**
**वैद्यकीय शिक्षणतज्ज्ञ आणि मानवतावादी प्राध्यापक, बार्सिलोना, स्पेन**


संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!

राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# राजापूर रस्ता कॉंक्रिटीकरण तातडीने करा - ग्रामस्थांची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पश्चिम भागाला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा असणारा संगमनेर ढोलेवाडी राजापूर जवळे कडलग गणोरे या रस्त्यावरील कॉंक्रिटीकरण अत्यंत चांगले झाले असून याच प्रमाणे नाशिक पुणे महामार्ग (बोगदा) ते राजापूर रस्त्याचे तातडीने कॉंक्रिटीकरण करावे अशी आग्रही मागणी राजापूर सह विविध ग्रामस्थांनी केली आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे मागणी करताना निवेदनात ग्रामस्थांनी म्हटले आहे की माजी मंत्री बाळासाहेब थोरात व आ. सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यातून २०२३ -२४ च्या अर्थसंकल्पातून संगमनेर ढोलेवाडी हायवे पर्यंतचे रस्त्याचे अत्यंत चांगले कॉंक्रिटीकरण झाले आहे. यामुळे दूध उत्पादक शेतकरी, शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला व परिसरातील नागरिकांची वाहतुकीची मोठी सोय झाली आहे. किंबहुना परिसरातील अनेक वृद्ध नागरिकांसह पेशंट यांना घेऊन येण्यासाठी तातडीची सुविधा उपलब्ध झाली आहे.

याचप्रमाणे नाशिक पुणे हायवे ते राजापूर रस्त्याचे कॉंक्रिटीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. हा रस्ता पश्चिम भागासह अकोले तालुक्याला जोडणारा असून यावरील विविध गावांमधील नागरिकांना दळणवळणासाठी चांगल्या सुविधा मिळाव्या याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात आ. सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने पाठपुरावा सुरू असून हा रस्ता तातडीने झाला पाहिजे अशी आग्रही मागणी या ग्रामस्थांची आहे.

यामुळे राजापूर, गुंजाळवाडी, चिकणी, निमगाव भोजापुर, जवळेकडलग सह पश्चिम भागातील शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी, शेतकरी, याचबरोबर वृद्ध नागरिक परिसरातील शेतकरी महिला यांच्याकरता अत्यंत सोय होणार आहे. या भागामध्ये भाजीपाला उत्पादक मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांचा भाजीपाला बाजारामध्ये आणण्यासाठी हा रस्ता अत्यंत गरजेचा आहे. आजारी नागरिकांना तातडीने दवाखान्यात येण्यासाठी किंवा शहरात पोहोचवण्यासाठी हा रस्ता कॉंक्रिटीकरण होणे अत्यंत गरजेचे असून शासनाने विना विलंब हा रस्ता तातडीने कॉंक्रिटीकरण करावा अशी आग्रही मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# कोकणगाव व शिवापूरमध्ये पोलिओ लसीकरण मोहीम उत्साहात

कोकणगाव - संगमनेर तालुक्यातील उपवैद्यकीय दवाखाना, कोकणगाव तसेच शिवापूर येथे २८ जून रोजी राष्ट्रीय पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे डोस देण्यात आले. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही मोहीम यशस्वीरीत्या पार पडली.

मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी कोकणगावच्या सरपंच श्रीमती आशाताई जोंधळे, उपसरपंच दिलीप जोंधळे, ग्रामपंचायत सदस्य सागर पारधी, सामाजिक कार्यकर्ते रमेश शिंगोटे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी चौक नियोजन वैद्यकीय अधिकारी डॉ. तय्यब तांबोळी, सामुदायिक आरोग्य अधिकारी सचिन गवारे, आरोग्य सेविका श्रीमती पौर्णिमा पंडुरे, आरोग्य सेवक नवनाथ पावडे तसेच आशा सेविका वर्षा गाडेकर, अनिता पारधी आणि आशा वायकर यांनी लसीकरण मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विशेष परिश्रम घेतले. लकांना पोलिओपासून सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याला पोलिओ प्रतिबंधक लसीचे डोस देणे आवश्यक असल्याचे आवाहन आरोग्य विभागाने यावेळी केले.



# टीईटी पेपरफुटी म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याने उद्या होणारी परीक्षा रद्द करण्याची वेळ आली आहे. ही घटना अत्यंत संतापजनक असून विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या विश्वासाला तडा देणारी आहे. लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मेहनतीवर, स्वप्नांवर तसेच भविष्यावर पुन्हा एकदा पाणी फिरल्याची संतप्त प्रतिक्रिया कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे.



यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात थोरात म्हणाले की, भाजपच्या सत्ताकाळात पेपरफुटी ही जणू नित्याची बाब बनली आहे. भरती परीक्षा असो किंवा पात्रता परीक्षा, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो तरुणांचे परिश्रम, वेळ आणि भविष्य धोक्यात आले आहे. शासनाच्या निष्काळजीपणाचा फटका प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत असून त्यांच्या मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसानीकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे.

तरुणांच्या आयुष्याशी असा खेळ करणाऱ्या सरकारला आता जनता 'पेपरफुटी सरकार' म्हणून ओळखू लागली असल्याची टीकाही त्यांनी केली. सरकारकडून या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होईल, अशी खात्री आता उरलेली नसल्याचे सांगत त्यांनी युवकांच्या आक्रोशाची आणि त्यांच्या वेदनांची शासनाने गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी केली. टीईटी पेपरफुटीप्रकरणी सखोल चौकशी करून या गैरप्रकारामागील सूत्रधारांचा शोध घ्यावा, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही बाळासाहेब थोरात यांनी केली.

# 'जीएसटी'वर आता एआयची नजर

मुंबई (वृत्तसंस्था)

देशात वस्तू आणि सेवा कर ( जीएसटी ) लागू होऊन १ जुलै रोजी १० वर्षे पूर्ण होत आहेत. या दशकात जीएसटीमुळे अप्रत्यक्ष कर व्यवस्थेत मोठे बदल झाले. आता सरकारचे लक्ष केवळ करसंकलन वाढविण्यावर नसून, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), जलद परतावा, माहितीचे एकत्रीकरण आणि कर प्रक्रिया सोपी करण्यावर केंद्रित झाले आहे. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना दिलासा देतानाच करचुकवेगिरीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.सरकार सध्या जीएसटी, आयकर आणि सीमाशुल्क विभागांची माहिती एकत्र जोडत आहे. त्यामुळे जोखमीचे अचूक मूल्यांकन करता येणार आहे.

# व्हायोलिन विशारद पूर्ण परीक्षेत प्रशांत तिवारी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील प्रशांत शरदप्रसाद तिवारी यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या व्हायोलिन विशारद पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



प्रशांत तिवारी हे बी.ए., डी.एड. शिक्षण पूर्ण करून ध्रुव ग्लोबल स्कूलमध्ये सन २०११ पासून संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी तबला विशारद ही पदवी संपादन केली असून, आता व्हायोलिन विशारद पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त करत संगीत विशारद ही पदवीही प्राप्त केली आहे. लहानपणापासूनच संगीताचा वारसा लाभलेल्या प्रशांत यांना त्यांचे वडील व ज्येष्ठ संगीत शिक्षक श्री. एस. आर. तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले. श्री. तिवारी हे अनेक वर्षे सिद्धार्थ विद्यालय येथे क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत होते. सध्या ते अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूल येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे संगीताची आवड आणि संस्कार प्रशांत यांना घरातूनच मिळाले.

प्रशांत यांना संगीत क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा त्यांचे बंधू प्रमोद तिवारी यांच्याकडून मिळाली. त्यांच्या प्रेरणेतून गिटार वादनाची आवड निर्माण झाली. सध्या ते विद्यार्थ्यांना संगीत शिक्षण देतानाच नियमित रियाज करतात. विद्यार्थ्यांना शिकवताना स्वतःचे ज्ञान अधिक समृद्ध होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांमुळेच स्वतःचा अभ्यास आणि रियाज सातत्याने सुरू राहण्यास मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले. या यशाचे श्रेय त्यांनी पुणे येथील आपल्या व्हायोलिन गुरु सौ. रश्मी सोमण, तबल्याचे गुरु श्री. अनिल डोळे, वडील, कुटुंबीय तसेच विद्यार्थ्यांना दिले. त्यांच्या या यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे अध्यक्ष डॉ. संजयजी मालपाणी, उपाध्यक्ष मा. गिरीश मालपाणी, माजी प्राचार्या अर्चना घोरपडे, नवनियुक्त प्राचार्या संध्या धूळगंडे, सहकारी शिक्षक, संगीतप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुंजेवाडीतील गॅस स्फोटग्रस्त कुटुंबाला यशोधन कार्यालयामार्फत मदतीचा हात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अकलापुर भागातील मुंजेवाडी येथील रहिवासी असणाऱ्या दिनेश कैलास कापसे यांच्या राहत्या घरामध्ये गॅसच्या टाकीचा स्फोट होऊन जीवनावश्यक वस्तू त्याचबरोबर घराचेही मोठे नुकसान झाले आहे. या कुटुंबीयांना लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी यशोधन कार्यालयाच्या माध्यमातून गृह उपयोगी साहित्य व किराणा देऊन मदतीचा हात दिला आहे.



अकलापुर भागातील मुंजेवाडी येथील कापसे कुटुंबीयांना यशोधन कार्यालयाच्या वतीने गृहउपयोगी साहित्य व किराणा किट देण्यात आली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा अकलापुर गावचे सरपंच अरुण वाघ, बाळू कापसे, संपत आभाळे, दत्तात्रय आभाळे, अनिता आभाळे, यशोधन कार्यालय आदिवासी विभाग प्रमुख बाळकृष्ण गांडाळ, रु राजवर्धन पिसाळ, नितीन अल्हाट यांसह अकलापूर नागरिक उपस्थित होते.

दिनेश कैलास कापसे हे अकलापूर भागातील मुंजेवाडी येथील रहिवासी असून त्यांची आर्थिक परिस्थिती ही मध्यमवर्गीय आहे. त्यात त्यांच्या राहत्या घरामध्ये गॅसच्या टाकीचा स्फोट झाला व जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. ही बातमी लोकनेते बाळासाहेब थोरात यांना समजताच त्यांनी तातडीने मदत करण्याच्या सूचना यशोधन कार्यालयाला दिल्या त्यानंतर लगेचच यशोधन कार्यालयाच्या वतीने कुटुंबांना गृह उपयोगी साहित्य व किराणा साहित्य देण्यात आले.

यावेळी अकलापूर येथील ग्रामस्थ, दिनेश कैलास कापसे व त्यांच्या कुटुंबीयांनी लोकनेते बाळासाहेब थोरात व यशोधन कार्यालयातील कृतज्ञता व्यक्त केली.

# शिक्षकांच्या समर्पित योगदानामुळे शिंदेवाडी शाळा समृद्ध -अनिल गायकवाड



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : चांगले शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा भक्कम पाया असून, शिक्षकांचे समर्पित योगदान आणि त्याला लाभलेली ग्रामस्थांची भक्कम साथ यामुळेच शिंदेवाडी शाळा खऱ्या अर्थाने समृद्ध झाली आहे, असे गौरवोद्गार विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांनी काढले.

तालुक्यातील गणोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी येथे श्री व श्रीमती रामनारायणजी बुब ट्रस्ट आणि अप्रोच हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने शाळेसाठी अत्याधुनिक इंटरक्टिव्ह डिजिटल बोर्ड तसेच ३५ विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. याशिवाय अनिकेत बॅटरी हाऊसच्या वतीने शाळेला इन्व्हर्टर व बॅटरी देणगी स्वरूपात प्रदान करण्यात आली. या शैक्षणिक साहित्याच्या लोकार्पण व वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून अनिल गायकवाड बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच संतोष आंबरे होते. प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र आंबरे, रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलग, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर दातीर, जगन्नाथ आहेर, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष अशोक आहेर आदी उपस्थित होते. तसेच ग्रामस्थांनीही उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय बॅग, शूज आणि अन्य शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लबचे संचालक सुनील कडलग यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ग्रामीण भागातील प्रत्येक प्राथमिक शाळा हे ज्ञान देणारे जीवन शिक्षण मंदिर आहे. ही मंदिरे भौतिक आणि डिजिटल साधनांनी समृद्ध झाली, तर देश अधिक सामर्थ्यसंपन्न होईल. मात्र, यासाठी केवळ शासनावर अवलंबून न राहता समाजातील प्रत्येक घटक आणि दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन योगदान देण्याची गरज आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (गणोरे) या शाळेस सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि उमंग फाउंडेशन, मुंबई यांच्या सीएसआर निधीतून स्वच्छतागृह व संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे माजी अध्यक्ष ऋषिकेश मोंढे यांनी स्टील कपाट, प्रा. मंगल गोडगे यांनी विद्यार्थ्यांना शालेय वह्या, तर मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांच्या मातोश्री स्व. रोहिणी राधाकृष्ण आरोटे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाळेत पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले. याशिवाय शाळेला रंगरंगोटी करून बोलक्या भिंतीही साकारण्यात आल्या.

दिगंबर दातीर यांनी स्टील ग्रील, कल्पना पाटील यांनी काच फलक, रविंद्र व गणेश आंबरे यांनी विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी जेवणाची ताटे, जिजाऊ ब्रिगेड, संगमनेर यांनी ३५ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, तर अनिता कोदे यांनी विद्यार्थ्यांना शूज व सॉक्स देणगी स्वरूपात दिले.

# रेल्वेचा हक्क हिरावला; संगमनेरकरांनी आता रस्त्यावर उतरावे - डॉ. जयश्री थोरात

## ७०० कोटींचे भूसंपादन करूनही मार्ग बदलला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : महाविकास आघाडी सरकारच्या काळात सर्व तांत्रिक बाबी, पर्यावरणीय मुद्दे, सुपीक जमीन आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन निश्चित करण्यात आलेला नाशिक-पुणे रेल्वे मार्ग महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर बदलण्यात आला. संगमनेर आणि अकोले तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असलेली ही रेल्वे शिर्डीकडे पळविण्यात आली आहे, असा गंभीर आरोप संगमनेर तालुका युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी केला.

नाशिक-पुणे रेल्वेप्रश्नी माध्यमांशी संवाद साधताना डॉ. थोरात म्हणाल्या की, महाविकास आघाडीच्या काळात पुणे-चाकण-नारायणगाव-आळेफाटा-संगमनेर-सिन्नर-नाशिक असा रेल्वेमार्ग निश्चित करण्यात आला होता. या मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला होता. तसेच भूसंपादन प्रक्रियाही मोठ्या प्रमाणात पूर्ण झाली होती. शेतकऱ्यांना नुकसानभरपाईपोटी ७०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम देण्यात आली होती. त्यावेळी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक बैठका घेऊन सुपीक जमीन, वनक्षेत्र आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन हा मार्ग निश्चित करण्यात आला होता. मात्र, महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २०२४ नंतर हा मार्ग बदलण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

एकीकडे पालकमंत्री वेगवेगळे दावे करत आहेत. कधी रेल्वे शिर्डीमार्गे जाणार असल्याचे सांगितले जाते, तर कधी देवठाणमार्गे मार्ग प्रस्तावित असल्याचे सांगितले जाते. मात्र, मूळ मंजूर मार्ग रद्द करून संगमनेरच्या वाट्याला आलेली रेल्वे शेजारच्या तालुक्याकडे वळविण्यात आली आहे, असेही त्या म्हणाल्या.



संगमनेर हा सहकार, शिक्षण आणि व्यापाराच्या क्षेत्रात राज्यातील एक आदर्श तालुका असल्याचे सांगत डॉ. थोरात म्हणाल्या, संगमनेर तालुक्यातील २५ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण आणि रोजगारासाठी पुण्यात आहेत. रेल्वेची सुविधा उपलब्ध झाली असती तर पुणे-संगमनेर हे अंतर अवघ्या दोन तासांत पार करता आले असते. सध्या नागरिकांना पाच ते सहा तासांचा बसप्रवास करावा लागतो. अनेक युवक जीव धोक्यात घालून दुचाकीने प्रवास करतात. त्यातून अनेक अपघात घडले आहेत. हा प्रश्न अत्यंत गंभीर असून, आता जनतेने रस्त्यावर उतरून लढा देण्याची वेळ आली आहे. केवळ नेते बोलून हा प्रश्न सुटणार नाही. सर्वसामान्य नागरिकांनीही एकत्र येऊन आपल्या हक्कासाठी संघर्ष केला पाहिजे.

युवक कॉंग्रेसच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात येणार असून, हक्काची रेल्वे मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. संगमनेर हा चळवळींमधून घडलेला तालुका आहे. संघर्ष करणे आमच्या रक्तात आहे. हक्काची रेल्वे मिळविण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरू, असे आवाहन डॉ. जयश्री थोरात यांनी केले.

## संपादकीय...

# टीईटी पेपरफुटी

# भ्रष्टाचाराने विद्वत्तेचा खून

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा पाया मानले जाते. गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था आणि पारदर्शक भरती प्रक्रिया ही सशक्त समाजाची ओळख असते. शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) ही राज्यातील लाखो युवक-युवतींसाठी शिक्षक होण्याचे स्वप्न साकार करण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. मात्र, परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका फुटल्याने परीक्षा रद्द करण्याची वेळ आली आणि पुन्हा एकदा लाखो विद्यार्थ्यांच्या आशा-आकांक्षांवर पाणी फिरले. ही केवळ एका परीक्षेची पेपरफुटी नसून, विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा, त्यांच्या मेहनतीचा आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा झालेला भंग आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात विविध भरती परीक्षा, स्पर्धा परीक्षा आणि पात्रता परीक्षांमध्ये सातत्याने पेपरफुटीच्या घटना घडत आहेत. पोलीस भरती, आरोग्य विभाग, शिक्षक भरती, एमपीएससी, टीईटी अशा अनेक परीक्षांभोवती संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येक वेळी सरकारकडून चौकशीचे आदेश दिले जातात, आरोपींना अटक केली जाते, कठोर कारवाईची भाषा केली जाते; परंतु काही दिवसांतच पुन्हा दुसऱ्या परीक्षेत अशाच प्रकारची घटना घडते. त्यामुळे या समस्या अपघाती नसून व्यवस्थेतील गंभीर त्रुटी आणि संघटित गैरव्यवहाराचे द्योतक असल्याचे स्पष्ट होते. पेपरफुटीचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना बसतो. ग्रामीण भागातील अनेक युवक शेती, मजुरी किंवा छोट्या-मोठ्या कामांमधून पैसे साठवून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. कोचिंग क्लासेस, वसतिगृह, प्रवास, अर्ज शुल्क आणि अभ्यास साहित्य यावर हजारो रुपये खर्च केले जातात. परीक्षा पुढे ढकलली किंवा रद्द झाली की हा सर्व खर्च वाया जातो. त्याहून मोठे नुकसान म्हणजे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचतो. अनेक जण नैराश्यात जातात, काहीजण स्पर्धा परीक्षाच सोडून देण्याचा निर्णय घेतात. या मानसिक आणि आर्थिक नुकसानीची भरपाई कोण करणार, हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहतो.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण होतो. जे विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून यश मिळवण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यापेक्षा पैसे देऊन किंवा गैरमार्गाने प्रश्नपत्रिका मिळवणाऱ्यांना संधी मिळत असेल, तर गुणवत्तेवर आधारित स्पर्धा ही संकल्पनाच धोक्यात येते. यामुळे मेहनती विद्यार्थ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होते आणि समाजात चुकीचा संदेश जातो की प्रामाणिकपणापेक्षा पैशाचे आणि ओळखीचे महत्त्व अधिक आहे. टीईटीसारखी परीक्षा ही भविष्यातील शिक्षकांची निवड करणारी परीक्षा आहे. शिक्षक हा समाज घडवणारा घटक आहे. अशा महत्त्वाच्या परीक्षेची विश्वासार्हताच संशयाच्या भोवऱ्यात अडकली, तर भविष्यातील शिक्षण व्यवस्थेवर त्याचे दूरगामी परिणाम होतील. अप्रामाणिक मार्गाने पात्र ठरलेले उमेदवार शिक्षण व्यवस्थेत दाखल झाले, तर त्याचा फटका पुढील अनेक पिढ्यांना बसू शकतो. त्यामुळे पेपरफुटी हा केवळ परीक्षा व्यवस्थेचा विषय नसून, तो समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक आरोग्याशी संबंधित प्रश्न आहे. आज माहिती तंत्रज्ञानाचा काळ आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल सुरक्षा आणि सायबर तंत्रज्ञानात देश झपाट्याने प्रगती करत आहे. अशा परिस्थितीत प्रश्नपत्रिकांची सुरक्षितता राखण्यात सातत्याने अपयश येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा केंद्रापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर आधुनिक सुरक्षा प्रणाली, एन्क्रिप्टेड डिजिटल व्यवस्थापन, बायोमेट्रिक पडताळणी आणि स्वतंत्र देखरेख यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे.

# संगमनेरमध्ये "महेश नवमी" उत्साहात साजरी

## ८१ हजाराच्या रोख बक्षीसाचे वितरण




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - माहेश्वरी समाजाचा उत्पत्ती दिन म्हणून साजरी होणारी महेश नवमी संगमनेरमध्ये धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. या निमित्ताने ८ दिवस विविध कार्यक्रम सुरू होते. या दरम्यान झालेल्या विविध स्पर्धांसाठी तब्बल रु. ८१ हजाराची रोख बक्षिसे ठेवण्यात आली होती.

महेश नवमी निमित्त आयोजित शोभा यात्रेच्या निमित्ताने रांगोळी ने सजलेले रस्ते, मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी होणारी पुष्पवृष्टी, राजस्थानी वेशभूषेत मोठ्या संख्येने सहभागी झालेले अबाल वृद्ध, पारंपारिक वाद्य व मिरवणूकीतील शिस्तबद्धपणा यामुळे शोभायात्रेने संगमनेरकरांचे लक्ष वेधून घेतले होते. तर शोभायात्रा समारोपप्रसंगी श्रीनिवास सोमानी (राजेंद्र उद्योग समूह) परिवाराच्या वतीने अल्पोपहार व युवा महेशच्या वतीने आईस्क्रीम सेवा देण्यात आली.

त्याचाच एक भाग म्हणून संगमनेर तालुका सभा व युवा महेश यांच्या संयुक्त विद्यमाने भंडारी मंगल कार्यालयात रक्तदान व अन्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा शुभारंभ सरपंच विश्वनाथ कलंत्री, तालुकाध्यक्ष संजय रा. मालपाणी, युवा महेश अध्यक्ष विनय तापडिया यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी राजेश लड्डा, बाळूशेठ भुतडा, अमित राठी यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे जनसंपर्क मंत्री अजय जाजू व शैलेश मालाणी यांनी रक्तदान केले. तर ज्येष्ठ नागरिक व महिलांच्या सुविधेकरीता एसटी महामंडळाअंतर्गत एनसीएमसी कार्ड, आयुष्यमान कार्ड, आयुष्यमान वय वंदना कार्ड चे देखील शिबिर घेण्यात आले. यास मोठा प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात ९२ बॅग्ज रक्त जमा झाले. यासाठी अर्पण रक्तपेढी चे सहकार्य लाभले. तर आधार कार्ड अपडेट ५७ व्यक्ती, एस.टी. कार्ड १५३ व्यक्ती, आयुष्मान भारत कार्ड १४१ व्यक्ती, आयुष्मान वय वंदना कार्ड ६८ व्यक्ती तर बारा अंकी रेशन कार्डचा ६० परिवाराने लाभ घेतला.

याप्रसंगी महासभा निवडणूक प्रचारार्थ संगमनेर येथे आलेले अखिल भारत वर्षीय माहेश्वरी महासभेचे अर्थमंत्री राजकुमार काल्या, संगठन मंत्री प्रवीण सोमाणी, उत्तरी राजस्थान प्रादेशिक माहेश्वरी सभा अध्यक्ष बाबुलाल मोहता, हैदराबाद तेलंगाना प्रांतीय माहेश्वरी सभा सचिव सी ए कन्हैयालाल राठी, महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा एवं ओंकारनाथजी मालपाणी महेश सेवा निधि के पूर्व अध्यक्ष श्रीकिशन भन्साळी यांनी भेट देऊन तालुका सभा व युवा महेश च्या उपक्रमाचे तसेच संगमनेर माहेश्वरी संगठन चे कौतुक केले.

या उत्सव सप्ताहात माहेश्वरी फ्रेंड्स प्रीमियर क्रिकेट लीग, टॅग अँड वॉर, जलद चालणे, एक मिनिट स्पर्धा, कॅरम व बुद्धिबळ स्पर्धा, अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा, रक्तदान शिबिर, एसटी पास कार्ड, आयुष्यमान कार्ड, आयुष्यमान वय वंदना कार्ड, सांस्कृतिक स्पर्धा, ट्रेझर हंट, बचपन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी घेण्यात आलेल्या म्युझिकल हौजी गेम साठी तब्बल रु. ५१ हजारची रोख बक्षिसे होती. याचे प्रकल्प प्रमुख म्हणून सुनीता व गिरीश मालपाणी, स्वाती व राजेश रा. मालपाणी, प्रियंका व रोहित मणियार आणि मेघा व सुमित अट्टल यांनी काम पाहिले. स्पोर्टस कार्निवल साठी मालपाणी ग्रुप चे विशेष सहकार्य लाभले.

# मालपाणी विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात इयत्ता दहावी मार्च २०२६ बॅचमधील गुणवंत व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी शारदा शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मा. सुवर्णाताई मालपाणी, सचिव मा. सतीश लाहोटी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मच्छिंद्र हापसे, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार, पालक प्रतिनिधी सौ. पूजा नागरे, सौ. मीना गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी केले. यावेळी त्यांनी शाळेतील २९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविल्याबद्दल आनंद व अभिमान व्यक्त केला. तसेच शाळेचा सलग शंभर टक्के निकाल लागण्याच्या यशस्वी परंपरेचे हे एक तप पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक मिळविणारा कुमार अथर्व प्रवीण जगताप (९७.८०%), द्वितीय क्रमांकाचा पियुष राजू पिंगळे (९७.२०%) व तृतीय क्रमांकाचा हर्षवर्धन अर्जुन भवार (९६.२०%) यांचा तसेच गुणवत्ता यादीतील इतर दहा विद्यार्थ्यांचा वाचनीय पुस्तक, रोख बक्षीस व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी मा. सुवर्णाताई मालपाणी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यशासाठी प्रामाणिक मेहनत, योग्य नियोजन व सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या वतीने अथर्व जगताप, प्राविण्या गोपाळे व अपेक्षा काकड यांनी मनोगते व्यक्त केली. संस्था, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळेच हे यश मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पालक प्रतिनिधी सौ. पूजा नागरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वर्षी दहावीच्या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पालकांच्या वतीने प्रवीण जगताप, अर्जून भवार,राजू पिंगळे व भाऊसाहेब काकड यांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमातील बक्षीस यादीचे वाचन विनायक हिरे यांनी केले. परिचय , सत्कार व सूत्रसंचालन निवेदन मानसी मुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. सुनील आढळ यांनी केले.


**शिक्षक पाहिजे**

**वीरभद्र शिक्षण प्रसारक संस्था निमज संचलित** भारतरत्न राजीव गांधी विद्यालय निमज या विद्यालयात मानधन तत्त्वावर अध्यापनासाठी बी.एस्सी.बी.एड.किंवा बी.ए.बी.एड (इंग्रजी) शिक्षक भरती करण्यात येणार आहे.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी बुधवार, दि. १ जुलै २०२६ रोजी स. १०:०० ते स.११.०० वाजेपर्यंत सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींसह भारतरत्न राजीव गांधी विद्यालय निमज येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

**अध्यक्ष व सचिव,**
**वीरभद्र शिक्षण प्रसारक संस्था निमज**
**संपर्क क्रमांक – मुख्याध्यापक – ९८६०७६४४५०**

**छोट्या जाहिरातांठीसंपर्क करा**
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
IMRAN AYYUB SHAIKH
NEW NAME AS
IMRAN AYYUB KURESHI
ADD - BUDDH VIHAR SAMOR , MOGALPURA ,KHATIK GALLI SANGAMNER , TAL- SANGAMNER DIST- AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAHEEN BANO ABDUL RAUF QURAISHI
NEW NAME AS
SHAHIN IMRAN QURESHI
ADD - BUDDH VIHAR SAMOR , MOGALPURA ,KHATIK GALLI SANGAMNER , TAL- SANGAMNER DIST- AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
NASREH ABDUL RASHID MOMIN
NASHRA ABDUL RASHID MOMIN
TO NEW NAME AS
NASHRA ABDUL RASHD MOMIN

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Sangita Manoj Borse
MY NEW NAME
Sangita Raghunath Gite
ADD - Balaji nagar ,bangalore no.6 near law college, Sangamner

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
Shaikh Anjumbano Shabbir
MY NEW NAME IS
Anjum Samir Shaikh
ADD - Gavandipura Pune Nasik Road Sangamner 422605 Dist - Ahilyanaga

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
1.ALVIRA JAVED JHAGIRDAR
2.JAGIRDAR ALWIRA JAWID
(Before Marriage)
AS A NEW NAME
ALVIRA IMRAN SHAIKH
ADD- R/O. JAHAGIRDAR WADA, KHAJAPURA SANGAMNER, DIST - AHILYANAGAR-422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
YASMEEN ZUBAIR SHAIKH
NEW NAME AS
YASMEEN JUNED PATHAN
ADD - KAMAL PETROL PUMP MAGE, BHARATNAGAR SANGAMNER, TAL- SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
JUNED MAGBULKHAN PATHAN
NEW NAME AS
JUNED MAKBUL PATHAN
ADD - KAMAL PETROL PUMP MAGE, BHARATNAGAR SANGAMNER, TAL- SANGAMNER , DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत ( तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
8999795056

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458






# कोकणगावच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही - आ. खताळ



अवघ्या दीड वर्षाच्या कालावधीत कोकणगाव गावासाठी २ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी दिला आहे या निधीच्या माध्यमातून निझर्णेश्वर देवस्थान परिसरा बरोबर गावाचा विकास होणार आहे मात्र एवढ्या निधीवर आपण न थांबता. पुढील काळात आणखी निधी आणून परिसराचा सर्वांगीण विकास केला जाईल. यासाठी निधीची कमतरता भासणार नाही असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी कोकणगाव करांना दिला.

संगमनेर तालुक्यातील कोकणगाव येथील कोल्हार घोटी राज्यमार्ग ते निझर्णेश्वर मंदिर रस्ते कामाचे भूमी पूजन आणि विविध विकास कामांचा लोकार्पण आ. अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर कोकणगाव येथील रामभाऊ जोंधळे, गंगाधर वायकर, बाळासाहेब जोंधळे, भाजपचे ज्येष्ठ नेते दादाभाऊ गुंजाळ, भाजप उप जिल्हाप्रमुख सचिन शिंदे, पप्पू गाढे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र सोनवणे, डॉ. संतोष डांगे, दत्तात्रय दिघे, सौरभ देशमुख, सुशील शेवाळे, बबन पवार, दिलीप वायकर, विलास काशीद, सोमनाथ जोंधळे, हिरामण वायकर, सोमनाथ जोंधळे, आदित्य पवार, संदीप जोंधळे, पंकज जोंधळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

आमदार अमोल खताळ म्हणाले की संगमनेर तालुक्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेक भाविक निझर्णेश्वर देवस्थानाच्या दर्शनासाठी येत असतात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या राजकीय सामाजिक कार्यक्रमांची सुरुवात याच निझर्णेश्वर महाराजांचे दर्शन घेऊनच होत असते. या मंदिर परिसराच्या विकासासाठी ते कायमच प्रयत्नशील राहत असतात . मात्र येथून मागे राजकीय अनस्था असल्यामुळे अनेक कामे रखडली होती. मात्र तुमच्या सर्वांच्याआशीर्वादा मुळे तालुक्यात परिवर्तन झाल्या नंतरच खऱ्या अर्थाने या देवस्थान परिसराच्या विकासालाही गती मिळाली आहे. वनविभागाची जमीन असतानाही आवश्यक परवानग्या घेऊन विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे. या देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली. त्यामुळे या रस्त्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून श्रावणमहिन्यापूर्वी संबंधित ठेकेदाराने या रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन करावे अशाही सूचना आमदार खताळ यांनी दिल्या. मंत्रालय स्तरावर निधी आणण्यासाठी फार मोठा पाठपुरावा करावा लागतो. त्यामुळे मंजूर झालेल्या प्रत्येक रुपयाचे काम दर्जेदार झालेच पाहिजे. निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट करण्यासही मागेपुढे पाहणार नाही. परंतु विकासकामे चांगल्या गुणवत्तेची होते की नाही याकडे ग्रामस्थांनीही लक्ष ठेवणे गरजेचे असल्याचे सांगत ते म्हणाले की गल्लीपासून दिल्लीपर्यंत महायुतीचे सरकार असल्याने विकास कामांना गती मिळत आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून कोकणगाव गावासाठी अडीच कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे या निधीच्या माध्यमातून निझर्णेश्वर देवस्थान परिसराचा विकास होणारच आहे परंतु गावातील विकास कामे ही मार्गी लागत आहे. याचे मला समाधान असून पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते आदी मूलभूत प्रश्न सोडविण्याची जबाबदारी माझी आहे मात्र प्रत्येक गावच्या ग्रामस्थांनी संयम ठेवावा, विकासकामांना सहकार्य करावे आणि येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती च्या पाठीमागे उभे राहून साथ द्यावी, असे आवाहन आमदार खताळ यांनी केले

निझर्णेश्वर मंदिर परिसराचा पर्यटन दृष्ट्या विकास करण्यासाठी याच परिसरात टायगर सफारी उभारण्या बाबतचा प्रस्ताव आपण दिला होता वनविभागाच्या माध्यमातून टायगर सफारी उभारण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे दिला आहे तो प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवला जाणार असल्याचे वनमंत्र्यांनी सांगितले आहे या बिबटचा सफारी मुळे परिसरातील तरुणांना नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

# टीईटी पेपरफुटी प्रकरण तीन आरोपींना पोलीस कोठडी

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात ठाणे पोलिसांनी भिवंडी परिसरात कारवाई करत राजीव कुमार, आकाश कुमार आणि धीरज सिंग या तिघांना अटक केली आहे. रविवारी (२८ जून) त्यांना भिवंडी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायाधीश एस. एम. सुतार(ड. च. उरीशिपींशी) यांनी त्यांना ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.तपासातून हे प्रकरण केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून, ते आंतरराज्यीय टोळीचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. अटकेतील आरोपींपैकी धीरज बलराज सिंग (२८) हा हरियाणाचा, तर राजीव साव (४५) आणि आकाशकुमार स्वराजकुमार (३०) हे बिहारचे रहिवासी आहेत. हे तिघेही दिल्लीहून महाराष्ट्रात आले होते. प्राथमिक तपासात त्यांनी दीड कोटी रुपयांना टीईटीची प्रश्नपत्रिका विकण्याचा प्रयत्न केल्याचा पोलिसांचा संशय आहे. या टोळीतील आणखी दोन संशयित आरोपी अद्याप फरार असून, पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत.पोलिसांनी या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी १० दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. पेपर नेमका कुठून आला, महाराष्ट्रात आणखी कुठे याची विक्री झाली का, आर्थिक व्यवहार कोणाशी झाले आणि या रॅकेटचे मोठे जाळे काय आहे, हे शोधणे गरजेचे असल्याचे सहायक पोलीस आयुक्त डॉ. विजय मराठे(उी. तळर्लीू चरींहिरी) यांनी न्यायालयासमोर मांडले. दरम्यान, आरोपी धीरज सिंगच्या वकिलांनी त्याला आरोग्याच्या समस्या असल्याचे सांगून वैद्यकीय उपचारांची गरज असल्याचे निदर्शनास आणून दिले.

# आरोपीला तातडीने अटक करा

## डॉ. जयश्रीताई थोरातांची प्रशासनाला मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर तालुका हा परिवार म्हणून जपत सर्व तालुक्याची काळजी घेतली. प्रत्येक कुटुंबीयांशी आत्मीयता आणि जिव्हाळा यामुळे हा तालुका परिवार झाला. संकटे आली तर जनतेच्या पाठीशी ते कायम उभे राहिले. वडगाव पान ॲसिड हल्ल्यांमध्ये जखमी झालेल्या मुलीला न्याय मिळावा याकरता डॉ. जयश्रीताई थोरात यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून आज त्यांनी कुटुंबीयांची भेट घेत या मुलीची चौकशी केली. न्यायासाठी आपण खंबीरपणे तुमच्या सोबत असल्याचे त्यांनी सांगितले. वडगाव पान येथील छोट्या चिमुकलीवर १७ मार्च २०२६ रोजी ॲसिड टाकून अमानुष हल्ला झाला या घटनेचे संपूर्ण राज्यात पडसाद उमटले. घटनेनंतर डॉ.जयश्रीताई थोरात यांनी तातडीने दवाखान्यांमध्ये जाऊन या मुलीची भेट घेतली. तर तिला न्याय मिळावा याकरता पोलीस प्रशासन आणि शासन दरबारी पाठपुरावा केला. मात्र १०० दिवस होऊनही न्याय न मिळाल्याने नगर येथे जाऊन लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस अधीक्षक सुदर्शन यांचीही भेट घेतली. या मुलीच्या चौकशीसाठी त्यांच्या घरी जाऊन मुलीची कुटुंबीयांशी संवाद साधला.

याच वेळी मुलीच्या प्रकृतीची चौकशी करत तिला दिलासा दिला. याचबरोबर इतके दिवस उलटूनही आरोपी मोकाट फिरत असल्याने पूर्ण तालुक्यात आणि नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे. याची दखल घेऊन प्रशासनाने आरोपीला तात्काळ अटक करावी. जेणेकरून अशा नराधमांना धाक मिळेल अशी मागणी केली. त्याचबरोबर या चिमुकलीला न्याय मिळेल याकरता लोकशाही मार्गाने आपण सदैव संघर्ष करण्यासाठी तयार असून मुलीच्या समवेत असल्याचे त्यांनी सांगत कुटुंबीयांना धीर दिला.

# अंबड येथे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा नागरी सत्कार

## आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते गौरव




युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचा अकोले तालुक्यातील अंबड येथे भव्य नागरी सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषमय वातावरणात पार पडला. शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि नागरिकांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात अकोलेचे आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते खासदार वाकचौरे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी संपूर्ण परिसर घोषणांनी दुमदुमून गेला होता. शिवसैनिकांनी फटाक्यांची आतषबाजी, पुष्पवृष्टी आणि जयघोष करत खासदार वाकचौरे यांचे जल्लोषात स्वागत केले.

अंबड येथे आयोजित करण्यात आलेल्या या नागरी सत्कार सोहळ्याला तालुक्यातील विविध गावांमधून शिवसैनिक, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी लोकसभेच्या निवडणुकीत मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबद्दल तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी खासदार वाकचौरे यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी लोकसभा मतदारसंघात विकासकामांना नवी दिशा मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

याप्रसंगी आमदार अमोल खताळ यांनी खासदार वाकचौरे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे जनसामान्यांशी नाळ जुळलेले नेतृत्व असून मतदारसंघातील विकासाच्या प्रश्नांवर ते सातत्याने पाठपुरावा करत आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरत आहेत. विकासाच्या राजकारणाला प्राधान्य देत सर्वसामान्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी जनतेने व्यक्त केलेल्या प्रेम, विश्वास आणि सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जनतेच्या आशीर्वादाने आणि विश्वासाने मला ही जबाबदारी मिळाली आहे. या जबाबदारीचे भान ठेवून लोकहित, विकास आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत राहणार आहे. शिर्डी लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, पायाभूत सुविधांचा विकास करणे आणि सर्वसमावेशक विकासाला गती देणे, हेच माझे ध्येय आहे, असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, मतदारसंघातील रस्ते, वीज, पाणी, सिंचन, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर प्राधान्याने काम करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्यासाठी तसेच शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या सोहळ्यात शिवसेना परिवारात जनसेवा, हिंदुत्व आणि विकासाच्या विचारांना अधिक बळ देण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचविणे, शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे आणि जनहिताचे निर्णय प्रभावीपणे राबविणे हेच आपले सामूहिक ध्येय असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# मराठी भाषेची शोकांतिका

## राजकारण्यांची मराठी भाषेची अनास्था व ढासळणारा स्तर

महाराष्ट्र हे एक सुशिक्षित, सुसंस्कृत, समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेले राज्य म्हणून संपूर्ण देशात ओळखले जाते. या राज्याच्या विधिमंडळात सर्वोच्च पदांवर बसलेल्या लोकप्रतिनिधींकडून उच्च दर्जाच्या भाषिक, सांस्कृतिक, नैतिक आचरणाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. परंतु, नुकतीच घडलेली एक घटना प्रत्येक मराठी भाषा प्रेमींच्या मनाला दुःख देणारी तसेच विचार करायला लावणारी ठरली आहे.

विधानसभा अध्यक्षांसारख्या सर्वोच्च, अत्यंत जबाबदार घटनात्मक पदावर बसलेल्या व्यक्तीने, संपूर्ण भारताातील व विशेषतः कोट्यवधी मराठी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्यासारख्या महनीय व्यक्तिमत्त्वाला श्रद्धांजली वाहण्याची औपचारिकता पूर्ण करताना मराठी भाषेविषयक दाखवलेला अक्षम्य निष्काळजीपणा अत्यंत क्लेशदायक होता. श्रद्धांजली वाहताना समोर दिलेला कागदही त्यांना नीट वाचता येत नव्हता. तो कागद वाचताना त्यांची जी तारांबळ उडाली, १०-१५ ओळी वाचून दाखवताना केलेल्या असंख्य चुका, त्यामुळे मराठी भाषेची जी दैना झाली, ती पाहून प्रत्येक मराठी भाषाप्रेमीचे, आशाताईंच्या चाहत्यांचे मन दुखावले गेले असेल यात शंका नाही. मनात एकाच वेळी तीव्र दुःख, संताप, उद्वेग अशा सर्व भावना दाटून आल्या.

शासकीय, राजकीय वर्तुळात सध्या एक प्रकारचा निगरगट्टपणा आणि संवेदनशून्यतेचा आजार पसरला आहे की काय, अशी शंका येते. जनतेला आणि आता आपल्या मातृभाषेलाही गृहीत धरण्याची ही कृती केवळ खेदजनक नाही, तर संतापजनक आहे. सर्वात दुर्दैवी गोष्ट म्हणजे, हे सर्व चुकीचे वाचन करताना, मराठी भाषेची विटंबना करताना संबंधित नेत्याच्या चेहऱ्यावर कमालीचा आत्मविश्वास दिसत होता. हा आत्मविश्वास किती पोकळ, उथळ होता याचे दर्शन संपूर्ण महाराष्ट्राला



झाले. पॉश कपडे घालून, उंची कोट चढवून सभ्यतेचा आव आणणारे हे राजकारणी जेव्हा जाहीर व्यासपीठावर तोंड उघडतात, तेव्हा त्यांच्या राजकीय आणि बौद्धिक पातळीचे खरे दर्शन घडते. हे आजकाल सर्रास सर्वत्र वरचेवर दिसून येते.

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, समृद्धीसाठी, प्रसारासाठी शासन दरवर्षी लाखो-करोडो रुपयांची उधळपट्टी करते. विविध समित्या, सरकारी जीआर, घोषणांचा पाऊस पाडला जातो, पण हे सर्व केवळ कागदावरच राहते. मराठी भाषेचे खरे सौंदर्य सरकारी अधिकाऱ्यांना, नेत्यांना स्पर्शही करू शकलेले नाही, हेच या उदाहरणावरून स्पष्ट होते. परप्रांतातील लोकांना मराठी शिकवण्याची भाषा करण्यापूर्वी, या राजकारण्यांना स्वतःलाच मराठी भाषेचे प्राथमिक धडे देण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. सध्याच्या एकंदर राजकारणात, शासकीय यंत्रणेत मराठी भाषेबद्दल कमालीची अनास्था वरचेवर दिसून येत आहे. मोजकेच राजकारणी लोक असे उरले आहेत जे अतिशय शुद्ध, उत्तम मराठी अभिमानाने बोलतात, ज्यांना खरोखरच मराठी भाषेची काळजी वाटते. दुर्दैवाने अशा लोकांची संख्या आता अगदीच नगण्य झाली आहे.

सर्वच क्षेत्रांत सध्या जे वैचारिक, सांस्कृतिक अधःपतन, विद्रुपीकरण सुरू आहे, त्याचेच प्रतिबिंब या भाषिक विटंबनेत पाहायला मिळते. आज अशा प्रकारची तोडकी-मोडकी, अशुद्ध मराठी ऐकून आपले महान मराठी साहित्यिक, ज्यांनी या भाषेला अमृताहूनी गोड मानले, ते मनातल्या मनात रडत असतील. त्यांची मान आज शरमेने खाली गेली असेल. आपल्या पूर्वजांनी समृद्ध केलेली ही ज्ञानभाषा आजच्या स्वार्थी, अज्ञानी राजकारण्यांमुळे किती पोरकी झाली आहे, हेच या निमित्ताने समोर आले.

या निमित्ताने आपल्याला ज्या प्रवृत्तीचे दर्शन घडले, त्यातून तरी आता संपूर्ण महाराष्ट्राचे आणि विशेषतः सत्ताधाऱ्यांचे डोळे उघडावेत. मराठी भाषा केवळ भाषणांपुरती किंवा मतांच्या राजकारणापुरती मर्यादित न ठेवता, ती समृद्ध करण्यासाठी राजकारण्यांनी स्वतःपासून प्रामाणिक प्रयत्न सुरू करावेत. जाहीर व्यासपीठावर भाषेची अक्षम्य विटंबना करणाऱ्यांनी किमान थोडीशी लाज बाळगून, नैतिकता दाखवून सर्व मराठीजनांची जाहीर माफी मागावी एवढीच एक मराठी भाषा प्रेमी म्हणून नम्र अपेक्षा आहे.

**– एक मराठी भाषा प्रेमी**

# संगमनेरच्या आदित्य कडलग यांची जागतिक विमा परिषदेसाठी निवड

## संगमनेरमधील पहिले 'सीओटी' मानकरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेरचे युवा विमा सल्लागार आदित्य सुनील कडलग यांनी विमा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचा 'सीओटी' (Court of the Table) आणि 'एमडीआरटी' (Million Dollar Round Table) सन्मान पटकावला आहे. त्यांच्या या अभूतपूर्व यशामुळे सिंगापूर येथे २२ ते २५ ऑगस्ट २०२७ दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या जागतिक विमा परिषदेसाठी त्यांची निवड झाली असून ते या प्रतिष्ठित परिषदेत सहभागी होणार आहेत.

टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेल्या आदित्य कडलग यांनी केवळ पाच महिन्यांत यंदाचे 'एमडीआरटी' मानांकन प्राप्त करून आपल्या सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे जागतिक स्तरावरील विमा क्षेत्रात संगमनेरचे नाव अभिमानाने झळकले आहे. विशेष म्हणजे, आदित्य कडलग यांनी २०२३ मध्ये विमा क्षेत्रात



पदार्पण करताच पहिल्याच वर्षी 'एमडीआरटी'चा मान मिळवला होता. त्यानंतर २०२४ मध्ये त्यांनी सलग तीन वेळा 'एमडीआरटी' मानांकन मिळवत जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित 'सीओटी' पुरस्कार पटकावला. हा सन्मान मिळवणारे ते संगमनेरमधील पहिले विमा सल्लागार ठरले.

आदित्य यांच्या या यशामागे त्यांचे वडील आणि 'कडलग इन्व्हेस्टमेंट'चे संस्थापक सुनील कडलग यांचा ३० वर्षांचा समृद्ध अनुभव आणि मार्गदर्शन लाभले आहे. विमा, म्युच्युअल फंड आणि आरोग्य विमा क्षेत्रात पारदर्शक सेवा देत सुनील कडलग यांनी ग्राहकांमध्ये विश्वासार्हता निर्माण केली आहे. विशेषतः कोरोना काळात अनेक कुटुंबांना मृत्यू दावे आणि वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

सामाजिक कार्यकर्ते आणि प्रभावी वक्ते म्हणूनही परिचित असलेल्या सुनील कडलग यांनी जवळे कडलग येथील स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय तसेच रोटरी क्लबच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. वडिलांचा सामाजिक आणि व्यावसायिक वारसा जपत आदित्य कडलग यांनीही ग्राहकांना आर्थिक नियोजन आणि उद्दिष्टपूर्तीसाठी सक्षम मार्गदर्शन करून अल्पावधीतच उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशासाठी टाटा एआयए लाईफ इन्शुरन्स कंपनीचे नाशिक शाखाधिकारी सचिन कोठारी, चीफ बिझनेस असोसिएट सुरज वानखेडे तसेच उपक्रमशील शिक्षिका आणि त्यांच्या मातोश्री वृषाली कडलग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याची भावना आदित्य यांनी व्यक्त केली आहे. आदित्य कडलग यांच्या या यशामुळे संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# चिकणीतील २०० एकर जमिनीचा प्रश्न कायदेशीर मार्गाने सोडवणार - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - चिकणी येथील २०० एकर जमिनीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असून तो सध्या न्यायालयीन प्रक्रियेत आहे. त्यामुळे काही कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. मात्र कायदेशीर तज्ज्ञांच्या मदतीने या प्रकरणाचा सखोल अभ्यास करून हा प्रश्न मार्गी लावला जाईल आणि संबंधितांना न्याय मिळवून दिला जाईल, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील चिकणी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गणपत वर्पे, सरपंच ॲड. गायत्री माळी, ज्येष्ठ नेते वाल्मीक शिंदे, संपतराव वर्पे, कचरू वर्पे, उत्तम वर्पे, माणिक वर्पे, अनिल वर्पे, गीताबाई वर्पे, कुसुम वाघचौरे, एकनाथ वर्पे, दत्तात्रय शिंदे, मुस्कुंद वर्पे, सिद्धार्थ शिंदे, मनोज वर्पे, विशाल वर्पे, दीपक वर्पे, नारायण वर्पे, दिलीप वर्पे, आदी उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, चिकणी गावावर माझे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष प्रेम आहे. आमदार झाल्यानंतर अवघ्या दीड वर्षांच्या कालावधीत चिकणी गावासाठी सुमारे १ कोटी २८ लाख रुपयांचा विकास निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून गावांतर्गत रस्ते, रस्त्यांचे मजबुतीकरण, देवस्थान विकास, पशुवैद्यकीय दवाखान्याच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम तसेच विजेचे रोहित्र आदी विकासकामे करण्यात आली आहेत. गावातील शेतकऱ्यांसाठी शेतरस्ते अत्यंत महत्त्वाचे असून कोणत्याही कारणामुळे ते रखडू दिले जाणार नाहीत. शिवरस्त्यांचे प्रश्न प्रशासनाच्या सहकार्याने टप्प्याटप्प्याने सोडवले जात आहेत, असेही त्यांनी सांगितले.

शासकीय योजनांचा लाभ देताना पक्ष, धर्म किंवा समाज असा कोणताही भेदभाव केला जात नाही. प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविणे हीच आपली प्राथमिकता आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांसाठी वीजबिल सवलत, सौरऊर्जा प्रकल्प अशा विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात आल्या आहेत. दुष्काळी भागात कायमस्वरूपी पाणी पोहोचविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने मोठे काम हाती घेण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

## नदीजोड प्रकल्पांना गती कधी ? - आ. तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -दुष्काळग्रस्त भागांना पाणीपुरवठा करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या नदीजोड प्रकल्पांच्या विलंबाचा मुद्दा आमदार सत्यजित तांबे यांनी पावसाळी अधिवेशनात विधानसभेत उपस्थित केला. नदीजोड प्रकल्प रखडल्याने दुष्काळी भागांच्या पाणीप्रश्नावर परिणाम होत असल्याबाबत त्यांनी सरकारला जाब विचारला. यावर उत्तर देताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले की, नदीजोड प्रकल्पांची प्रशासकीय प्रक्रिया सुरू असून भूसंपादन, सर्वेक्षण आणि पर्यावरण मंजुरीची कामे प्रगतीपथावर आहेत.गोदावरी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ३२८.८० कोटी रुपयांची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेपैकी सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली.

# डॉ. संतोष खेडलेकर यांना प्रतिष्ठेची कुसुमाग्रज फेलोशिप

## तमाशाच्या बदललेल्या स्वरूपाचा होणार अभ्यास



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नासिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी मराठी साहित्यात मोलाची भर टाकणाऱ्या लेखकाला रुपये एक लक्ष मुल्याची कुसुमाग्रज फेलोशिप (अभ्यासवृत्ती) दिली जाते. सन २०२६/२०२७ या वर्षासाठी संगमनेर येथील डॉ. संतोष खेडलेकर यांची निवड करण्यात आली आहे अशी माहिती कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली आहे.

डॉ. खेडलेकर हे मागील तीन दशकांपासून तमाशा आणि इतिहास विषयाचे अभ्यासक म्हणून परिचित आहेत. सध्या ते संगमनेर महाविद्यालयात पुणे विद्यापिठाच्या पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विभागप्रमुख म्हणून काम पाहत आहेत. सन १९७५ ते २०२५ या पन्नास वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय लोककला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तमाशाचे बदलते स्वरूप आणि त्याची कारणमीमांसा या विषयावर ते अभ्यास करणार आहेत. या निवडीच्या वेळी कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष प्रकाश होळकर, सहकार्यवाह ॲड. राजेंद्र डोखळे, कोषाध्यक्ष ॲड. दत्तप्रसाद निकम, विश्वस्त डॉ. दिलीप धोंडगे आणि सल्लागार मंडळ सदस्य उपस्थित होते. डॉ. खेडलेकरांच्या निवडीबद्धल कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे विश्वस्त मंडळ तसेच राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, नासिक पदवीधर मतदार संघांचे आमदार सत्यजित तांबे, पद्मश्री रघुवीर खेडकर, तमाशा परिषदेचे अध्यक्ष संभाजीराजे जाधव आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**१९७५ नंतरच्या काळात तमाशात सर्वार्थाने आमुलाग्र बदल झाले आहेत. या बदलांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे होते. या संशोधनासाठी कुसुमाग्रज प्रतिष्ठानने माझ्यावर विश्वास दाखवून एक लाख रुपयांची फेलोशिप जाहीर केली याचा मनापासून आनंद आहे. येत्या वर्षभरात हे संशोधन पूर्ण करून त्याला पुस्तकरूप देण्याचा मानस आहे.**

# काहींच्या रक्तात आणि नसानसात...

पान १ वरून - शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी या बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांचा दौरा सुरू केला आहे. या दौऱ्याच्या तिसऱ्या दिवशी ते शिर्डीत दाखल झाले. साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी आयोजित जाहीर सभेत बंडखोर खासदारांवर टीकेची झोड उठवली. सभेच्या प्रारंभीच त्यांनी आपल्या खास शैलीत उपस्थितांना उद्देशून बोलताना भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावर पहिला शाब्दिक वार केला. मी भाषण सुरू करण्यापूर्वी एक सूचना झाली. कुणाच्या तरी गाडीची चावी हरवली आहे, ती सापडल्यास परत करा. मात्र, मीही एक सूचना करतो. आपला खासदार पळाला आहे. तो सापडला तर त्याला परत आणू नका, असे म्हणताच सभास्थळी एकच हशा आणि टाळ्यांचा कडकडाट झाला.

यावेळी ठाकरे म्हणाले की, आजच्या राजकारणात कोणावर विश्वास ठेवायचा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. काही लोकांच्या रक्तातच गद्दारी भिनलेली असते. ते कुठेही जातात, कुणासोबतही राहतात; पण त्यांचे लक्ष फक्त स्वतःच्या स्वार्थाकडे असते. म्हणूनच मी त्यांना 'खाऊसाहेब' म्हणतो. जाऊ तिथे खाऊ, अशी त्यांची वृत्ती आहे. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पूर्वीच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना उद्धव ठाकरे म्हणाले, २००९ मध्ये यांना शिवसेनेने संधी दिली, जनतेने निवडून दिले. २०१४ मध्ये हे पक्ष सोडून गेले. आता पुन्हा तेच घडले. काही कार्यकर्ते मला म्हणाले की, साहेब, हा शुभशकून आहे. २०१४ मध्ये हा गेला आणि आपले सरकार आले. आता पुन्हा गेला आहे, त्यामुळे त्यांचंही सरकार पडल्याशिवाय राहणार नाही.

शिर्डी ही श्रद्धा आणि सबुरीची भूमी असल्याचे सांगत ठाकरे म्हणाले, ही पवित्र शिर्डीची भूमी आहे. आमची श्रद्धा साईबाबांवर, भगव्यावर आणि जनतेच्या विश्वासावर आहे. मात्र, ज्यांची रोज नवीन बाप शोधण्याची सवय आहे, त्यांच्याकडून निष्ठेची अपेक्षा कशी करणार? यांची कुठल्याही तत्त्वांवर श्रद्धा नाही आणि सबुरीचा तर पत्ताच नाही.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
• हृदयरोग (Heart Diseases)
• मेंदूरोग (Brain Diseases)
• कर्करोग शस्त्रक्रिया
• अपघात (Accident)
• लहान बालकांची शस्त्रक्रिया
• गुडघ्याचे प्रत्यारोपण
• विद्युत अपघात रुग्ण
• कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
• डायलिसिस
• अपघात शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण
• मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर




अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25